रस्त्यांवरील कॉजवेचे व्हेंटस मोकळे करणे व पुलांचे कठडे सुस्थितीत ठेवणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
क्रमांक :- आरएमआर २००६/प्र.क्र. १९७/रस्ते १
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ६/५/२००६.

**संदर्भ** :- सार्वजनिक बांधकाम विभाग, तांत्रिक परिपत्रक क्र. आरएमआर १०८२/(२१४)/डेस्क आर-१,दिनांक : ८ ऑक्टोबर,१९८४.

रस्त्यांवरील पुलांची दुरुस्ती व देखभाल करण्याबाबत सविस्तर सूचना संदर्भीय परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. पूल व मोऱ्यांची पाहणी व आवश्यक दुरुस्त्या वेळेत करण्याबाबत शासनाचे परिपत्रक क्रमांक आरएमआर २००६/प्र.क्र. ८/रस्ते १, दिनांक २५/१/२००६ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि कांही ठिकाणी कॉजवेचे व्हेंटस मोकळे नाहीत व पुलावरील कठडे अद्यापही सुस्थितीत नाहीत असे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. ही बाब लक्षात घेता, पुढीलप्रमाणे सविस्तर सूचना देण्यात येत आहेत :-

१) कॉजवेची पाहणी पावसाळयापूर्वी करुन व्हेंटवे मोकळे आटेत व पुरामुळे (Out flanking) पोंचमार्ग तूटणार नाहीत याची खबरदारी उप अभियंता/कार्यकारी अभियंता यांनी घ्यावी.

२) सबमर्सिबल पुलाचे ठिकाणी रेलींग सुस्थितीत आहे, याची खात्री उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी व्यक्तीशः करावी. सबमर्सिबल पुलाचे रेलींग जून महिन्यात काढणे व पावसाळयानंतर नोव्हेंबर महिन्यात बसविणे याची खबरदारी उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी घ्यावी. अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांनी त्यांच्या दौऱ्यात याबाबत विशेष लक्ष देवून रेलींग सुस्थितीत नसेल अशा ठिकाणी संबंधित कर्मचारी/अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करावी.

३) कॉजवेच्या ठिकाणी गाईड पोस्टची दुरुस्ती किंवा पुर्नबांधणी करण्यात यावी.

रस्त्यावरील वाहतूक सुरळीत राहण्याच्या दृष्टीने कॉजवे तसेच पुलावरील कठडे सुस्थितीत असणे अत्यावश्यक आहे. तेव्हा याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी वैयक्तीक लक्ष पुनश्च वेधण्यात येत आहे.

( ना. शं. उमाटे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
सर्व अधीक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
सर्व कार्यकारी अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग,